**अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००८ यांचे कार्यालय**

**जाहिरात क्रमांक - आस्था-१/ई-५/सरळसेवा भरती/२०१५/८७२४ , पुणे दिनांक १६/१२/२०१५**

महाराष्ट्र शासन गृह विभाग आदेश क्रमांक पीडब्ल्युएस-०५१५/प्र.क्र.४०८/पोल-४, दिनांक ०१ डिसेंबर २०१५, अन्वये अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिपत्याखालील गट ''क'' संवर्गातील राज्यस्तरीय सरळसेवेची रिक्त पदे भरावयाची असून त्यासाठी मागासवर्गीय / खुला प्रवर्गातील इच्छुक व अर्हताप्राप्त उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. भरावयाच्या पदांचा तपशिल खालील प्रमाणे.

| जाहिरात क्रमांक | पदनाम | एकूण पदसंख्या | पे बँड (रुपये) | ग्रेड पे (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक पोलीस उप निरीक्षक (रेडीओ यांत्रिकी) | १९१ पदे | ५२००-२०२०० | २८०० |
| २ | पोलीस हवालदार (बिनतारी यंत्रचालक) | ४३२ पदे | ५२००-२०२०० | २४०० |
| ३ | पोलीस हवालदार (वीजतंत्री) | ५२ पदे | ५२००-२०२०० | २४०० |
| ४ | पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) | ५३ पदे | ५२००-२०२०० | १८०० |

**टिप :- महाराष्ट्र शासनाच्या तरतुदीनुसार उपरोक्त नमुद संवर्गातील पदांपैकी अनुकंपा तत्वावरील उमेदवारांकरिता १० टक्के इतकी पदे राखीव राहतील तथा अनुकंपा तत्वावरील उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची रिक्त पदे गुणवत्ता व सामाजिक आरक्षणानुसार भरणेत येतील.**

**या भरतीचे सर्व नियम, अटी, अर्ज करण्याची पध्दत व उपरोक्त नमूद पदांकरिताचे संवर्गनिहाय सामाजिक व समांतर आरक्षणाचे तपशिलवार विवरण www.mahpolwireless.gov.in व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर (Home Page) देण्यात आलेले आहे.**

२) उपरोक्त संवर्ग पदांच्या भरतीबाबतचे (सेवाप्रवेश) नियम २०१२ दिनांक ०६/०३/२०१२ व (सुधारणा) नियम २०१४ दिनांक ०४/०३/२०१४ आणि त्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय उक्त नमूद संकेत स्थळांवर उपलब्ध असून ते उमेदवारांना लागू राहतील.

३) नमूद संवर्ग पदांची निवड प्रक्रिया ही ऑनलाईन परिक्षा पध्दतीने घेण्यात येणार असून दिनांक व वेळ उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. जाहिरातीमधील नमूद अटींची पूर्तता करणारे उमेदवार खालील विहित दिनांकाचे मुदतीत ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज, परिक्षा शुल्कासह भरु शकतात. आवेदन अर्ज एकदा Submit केलेनंतर त्यात पुन्हा बदल करता येणार नाही.

अ) ऑनलाईन आवेदन अर्ज सुरु होण्याचा दिनांक व वेळ :- दिनांक १८/१२/२०१५ वेळ - ०९.०० वाजलेपासून.

ब) ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ :- दिनांक ०६/०१/२०१६ वेळ - २३.५९ वाजेपर्यंत.

क) ऑनलाईन पध्दतीने परिक्षा शुल्क भरता येऊ न शकणाऱ्या उमेदवारांकरिता भारतीय स्टेट बँकेत (SBI) चलनाद्वारे शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक ०७/०१/२०१६ (बँकेच्या निर्धारित वेळेमध्ये), परिक्षा शुल्कासोबत बँकेच्या नियमानुसार असलेले सेवाशुल्क देय राहील.

४) नक्षलग्रस्त भागातील उमेदवारांसाठी विशेष तरतूदीं बाबतची माहिती उपरोक्त नमूद संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

५) पोलीस विभागातील अनुकंपा तत्त्वावरील अर्हताप्राप्त उमेदवारांनी त्यांचे अर्ज ऑनलाईन ऐवजी आपापल्या घटकप्रमुखांमार्फत दि.१८/०१/२०१६ रोजी पर्यंत किंवा त्यापूर्वी या कार्यालयास पोहोचतील असे सादर करावेत.

६) उमेदवाराकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे आवश्यक आहे.

७) उमेदवाराने त्याची अर्हता विषयक आवश्यक ती प्रमाणपत्रे, अर्ज भरावयाच्या शेवटच्या दिनांका पर्यंत (दिनाक ०६/०१/२०१६) संबंधीत विभागांकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

८) उमेदवारांच्या परिक्षा प्रवेश पत्र (हॉल तिकीट) व परिक्षा केंद्र इत्यादीबाबतची माहिती नमूद संकेत स्थळांवर उपलब्ध करुन देण्यात येईल. याबाबत उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळास भेट देऊन माहिती घ्यावी. त्याकरिताची संपूर्ण जबाबदारी उमेदवारांची राहील.

९) सदर परीक्षेसाठी सर्व पदांकरीता परीक्षा शुल्क - खुला प्रवर्ग रुपये ५५०/- व मागास प्रवर्ग रुपये ४५०/- राहील. सदर शुल्क ना-परतावा आहे.माजी सैनिक यांचे करीता कोणतेही परिक्षा शुल्क लागू राहणार नाही.

१०) उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचणी भासल्यास, त्यांनी महाऑनलाईनच्या ०२२-६१३१६४०० या हेल्प लाईन नंबरवर ०९:३० ते १९:३० या वेळेत संपर्क करावा.

११) उमेदवारांनी त्यांचे अर्ज परस्पर या कार्यालयास पाठवू नयेत, अशा प्रकारे प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही. अर्ज फक्त ऑनलाईनच भरावेत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१२) मागासवर्गीय उमेदवारांनी, ऑनलाईन अर्ज सादर करण्यापूर्वी कोणत्या प्रवर्गातून अर्ज भरावयाचा आहे हे निश्चित करुनच ऑनलाईन अर्जात तशी माहिती नोंद करावी. याबाबत, उमेदवारांकडून नंतर कोणतेही अभिवेदन अथवा तक्रार घेतली जाणार नाही.

१३) भरती प्रक्रियेअंतर्गत पदांची संख्या, प्रवर्गनिहाय पदसंख्या, सदर भरती प्रक्रियेमध्ये अंशत: बदल करणे, स्थगित करणे, कोणत्याही टप्प्यावर रद्द करणे, याबाबतचे सर्व अधिकार भरती प्राधिकारी यांना राहतील तसेच भरतीबाबत काही विवाद निर्माण झाल्यास, त्याबाबतचा अंतिम निर्णय हा भरती प्राधिकारी यांचा राहील.

**(ई.दा.कांबळे)**
अध्यक्ष, भरती प्रक्रिया समिती **तथा**
पोलीस अधीक्षक, बि.सं. मुख्यालय
अपर पोलीस महासंचालक व संचालक
पोलीस बिनतारी संदेश, म.राज्य, पुणे कार्यालय

# अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००८ यांचे कार्यालय

**जाहिरात क्रमांक - आस्था-१/ई-५/सरळसेवा भरती/२०१५/८७२५, पुणे दिनांक १६/१२/२०१५**

महाराष्ट्र शासन गृह विभाग आदेश क्रमांक पीडब्ल्युएस-०५१५/प्र.क्र.४०८/पोल-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१५ अन्वये अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.राज्य, पुणे यांचे अधिपत्याखालील गट ''क'' संवर्गातील राज्यस्तरीय सरळसेवेची रिक्त पदे भरावयाची असून त्यासाठी मागासवर्गीय / खुला प्रवर्गातील इच्छुक व अर्हताप्राप्त उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. भरावयाच्या पदांचा तपशिल खालील प्रमाणे.

| जाहिरात क्रमांक | पदनाम | एकूण पदसंख्या | पे बँड (रुपये) | ग्रेड पे (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक पोलीस उप निरीक्षक (रेडीओ यांत्रिकी) | १९१ पदे | ५२००-२०२०० | २८०० |
| २ | पोलीस हवालदार (बिनतारी यंत्रचालक) | ४३२ पदे | ५२००-२०२०० | २४०० |
| ३ | पोलीस हवालदार (वीजतंत्री) | ५२ पदे | ५२००-२०२०० | २४०० |
| ४ | पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) | ५३ पदे | ५२००-२०२०० | १८०० |

**टिप :- महाराष्ट्र शासनाच्या तरतुदीनुसार उपरोक्त नमुद संवर्गातील पदांपैकी अनुकंपा तत्वावरील उमेदवारांकरिता १० टक्के इतकी पदे राखीव राहतील तथा अनुकंपा तत्वावरील उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची रिक्त पदे गुणवत्ता व सामाजिक आरक्षणा नुसार भरणेत येतील.**

**२.** उपरोक्त संवर्ग पदांच्या भरतीबाबतचे (सेवाप्रवेश) नियम २०१२, दिनांक ०६/०३/२०१२ व (सुधारणा) नियम २०१४, दिनांक ०४/०३/२०१४ आणि त्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय अपर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस बिनतारी विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संकेतस्थळ **www.mahpolwireless.gov.in** व महाऑनलाईन (MahaOnline) या संस्थेच्या **https://maharecruitment.mahaonline.gov.in** या संकेत स्थळावर (Home page) वर उपलब्ध करून दिलेले आहेत ते उमेदवारांना लागू राहतील. वरील नमूद पदांच्या, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि शारिरीक पात्रता या बाबतच्या अटी व शर्ती जाहिरातीमधील संबंधित पदांच्या खाली दर्शविण्यात आलेल्या आहेत.

**३.** नमूद संवर्ग पदांची निवड प्रक्रिया ही ऑनलाईन परिक्षा पध्दतीने घेण्यात येणार असून त्याबाबतचा दिनांक व वेळ उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. जाहिरातीमधील नमूद अटींची पूर्तता करणारे उमेदवार खालील विहित दिनांकाचे मुदतीत ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज, परिक्षा शुल्कासह भरु शकतात.

अ) ऑनलाईन आवेदन अर्ज सुरु होण्याचा दिनांक व वेळ :- दिनांक १८/१२/२०१५ वेळ - ०९.०० वाजलेपासून.

ब) ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ :- दिनांक ०६/०१/२०१६ वेळ - २३.५९ वाजेपर्यंत.

क) ऑनलाईन पध्दतीने परिक्षा शुल्क भरता येऊ न शकणाऱ्या उमेदवारांकरिता भारतीय स्टेट बँकेत (SBI) चलनाद्वारे शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक ०७/०१/२०१६ (बँकेच्या निर्धारित वेळेमध्ये) देय परिक्षा शुल्कासोबत बँकेच्या नियमानुसार अतिरिक्त सेवाशुल्क देय राहील.

## ४. भरती करावयाची पदे :-

**अ) <u>पदाचे नाव</u> :-सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (रेडिओ यांत्रिकी):-**
**(पे बँड :-रुपये ५२००-२०२०० ग्रेड पे-२८००), एकूण पदे :- १९१**

| सामाजिक आरक्षण / कप्पीकृत आरक्षण | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | विमुक्त जाती अ | | भटक्या जमाती ब | | भटक्या जमाती क | | भटक्या जमाती ड | | विशेष मागास प्रवर्ग | | इतर मागास वर्ग | | खुला | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** |
| सर्वसाधारण | ८ | ३ | १० | ४ | २ | १ | २ | १ | ५ | २ | २ | १ | १ | १ | १३ | ३ | ३८ | १६ | ८१ | ३२ |
| खेळाडू | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ४ | १ | ७ | २ |
| प्रकल्पग्रस्त | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ४ | १ | ७ | २ |
| भूकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | १ | २ | १ |
| माजी सैनिक | ३ | ० | ३ | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ५ | ० | १४ | ० | २९ | ० |
| गृहरक्षक दल | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ४ | १ | ७ | २ |
| अंशकालीन पदवीधर | १ | १ | १ | १ | १ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | ६ | ३ | १३ | ६ |
| एकूण जागा | **१५** | **४** | **१७** | **५** | **४** | **१** | **४** | **१** | **७** | **२** | **३** | **१** | **१** | **१** | **२४** | **७** | **७१** | **२३** | **१४६** | **४५** |

समांतर आरक्षण नमूद तक्त्यानुसार लागू राहील. तक्त्यामध्ये दर्शविलेली पदे व त्यानुसार आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. या पदावरील नियुक्ती ही खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येईल.

**(i) वयोमर्यादा -** दिनांक ०१/१२/२०१५ रोजी ज्यांचे वय २० वर्षापेक्षा कमी व २७ वर्षापेक्षा जास्त नाही. मागसावर्गीयांचे बाबतीत शासनाने निर्देशित केलेप्रमाणे उच्चतम वयोमर्यादेत ५ वर्षे सवलत अनुज्ञेय राहील.
अगोदरपासून शासन सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांना कमाल वयोमर्यादेत ०५ वर्षे सूट देय राहील.

**(ii) शैक्षणिक अर्हता -**

(अ) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण **आणि**

(ब) राज्य तंत्रशिक्षण मंडळाची खालीलपैकी कोणतीही एक पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

१) इलेक्ट्रॉनिक्स आणि रेडिओ अभियांत्रिकी पदविका.
(Diploma in Electronics and Radio Engineering)

२) इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी पदविका
(Diploma in Electronics and Telecommunication Engineering)

३) औद्योगिक इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी पदविका.
(Diploma in Industrial Electronics)

४) संगणक अभियांत्रिकी पदविका. (Diploma in Computer Engineering)

५) माहिती तंत्रज्ञान पदविका. (Diploma in Information Technology)

**(iii) अनुभव -** उक्त (ii) मध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेशी संबंधित क्षेत्रातील, शासनमान्य किंवा नोंदणीकृत संस्थेतील अथवा उद्योगातील अथवा संशोधन आणि विकास संस्थेतील किमान एक वर्ष कामाचा प्रत्यक्ष अनुभव धारण केलेला असणे आवश्यक आहे.

**(iv) शारिरीक पात्रता :-**

| | **पुरुषांकरिता** | **महिलांकरिता** |
|---|---|---|
| अ) उंची | १६३ सें.मी. पेक्षा कमी नसावी | १५३ से.मी. पेक्षा कमी नसावी |
| ब) छाती | न फुगवता ७९ सें.मी. आणि फुगवून ८४ से.मी. पेक्षा कमी नसावी (न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा). | ----- |

**ब) <u>पदाचे नाव</u>:-पोलीस हवालदार (बिनतारी यंत्रचालक) :-**
**(पे बँड :-रुपये ५२००-२०२००,ग्रेड पे-२४००), एकूण पदे :- ४३२**

| सामाजिक आरक्षण / कप्पीकृत आरक्षण | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | विमुक्त जाती अ | | भटक्या जमाती ब | | भटक्या जमाती क | | भटक्या जमाती ड | | विशेष मागास प्रवर्ग | | इतर मागास वर्ग | | खुला | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म |
| सर्वसाधारण | २७ | १२ | १६ | ७ | ३ | २ | ५ | २ | ४ | २ | ३ | १ | २ | १ | ३५ | १५ | ७७ | ३४ | १७२ | ७६ |
| खेळाडू | २ | १ | १ | १ | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ३ | १ | ७ | ३ | १६ | ६ |
| प्रकल्पग्रस्त | २ | १ | १ | १ | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ३ | १ | ७ | ३ | १६ | ६ |
| भूकंपग्रस्त | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ३ | १ | ६ | २ |
| माजी सैनिक | १० | ० | ६ | ० | २ | ० | १ | ० | २ | ० | २ | ० | १ | ० | १३ | ० | २९ | ० | ६६ | ० |
| गृहरक्षक दल | २ | १ | १ | १ | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ३ | १ | ७ | ३ | १६ | ६ |
| अंशकालीन पदवीधर | ५ | २ | ३ | १ | १ | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | ६ | ३ | १३ | ६ | ३२ | १२ |
| एकूण जागा | ४९ | १७ | २९ | ११ | ९ | २ | ७ | २ | १० | २ | ९ | १ | ४ | १ | ६४ | २२ | १४३ | ५० | ३२४ | १०८ |

समांतर आरक्षण नमूद तक्त्यानुसार लागू राहील. तक्त्यामध्ये दर्शविलेली पदे व त्यानुसार आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. या पदावरील नियुक्ती ही खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येईल.

**(i) वयोमर्यादा :-** दिनांक ०१/१२/२०१५ रोजी ज्यांचे वय १९ वर्षापेक्षा कमी व २६ वर्षापेक्षा जास्त नाही. मागसावर्गीयांचे बाबतीत शासनाने निर्देशित केलेप्रमाणे उच्चतम वयोमर्यादेत ५ वर्षे सवलत अनुज्ञेय राहील.
अगोदरपासून शासन सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांना कमाल वयोमर्यादेत ०५ वर्षे सूट देय राहील.

**(ii) शैक्षणिक अर्हता :-**

(अ) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे **आणि**

(ब) महाराष्ट्र राज्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचेकडील (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील) दोन वर्षाचा खालीलपैकी कोणताही एक अभियांत्रिकी व्यावसायिक अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेला असावा,-

(१) मॅकेनिक कम ऑपरेटर इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन सिस्टीम, (Mechanic-cum-Operator Electronic Communication System)
(२) यांत्रिक रेडिओ व दूरचित्रवाणी (Mechanic Radio and Television)
(३) माहिती तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स (Information Technology and Electronic Systems Maintenance)
(४) वायरलेस मेकॅनिक कम ऑपरेटर (Wireless Mechanic-cum-Operator)
(५) इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक (Electronics Mechanic)

**(iii) अनुभव -** उक्त (ब) मध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेशी संबंधित क्षेत्रातील, शासन मान्य किंवा नोंदणीकृत संस्थेतील अथवा उद्योगातील अथवा संशोधन व विकास संस्थेतील एक वर्ष कालावधीचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव धारण केलेला असणे आवश्यक आहे.

**किंवा**

एक वर्षाचे संबंधित अप्रेन्टीसशीप ट्रेनिंग सर्टिफिकेट (एटीसी) धारण केले असणे आवश्यक आहे.

**(iv) शारिरीक पात्रता :-**

| | **पुरुषांकरिता** | **महिलांकरिता** |
|---|---|---|
| अ) उंची | १६३ सें.मी. पेक्षा कमी नसावी | १५३ से.मी. पेक्षा कमी नसावी |
| ब) छाती | न फुगवता ७९ सें.मी. आणि फुगवून ८४ से.मी. पेक्षा कमी नसावी (न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा). | ----- |

**क) <u>पदाचे नाव</u> :- पोलीस हवालदार (वीजतंत्री) :-**
**(पे बँड :-रुपये ५२००-२०२०० ग्रेड पे - २४००) , एकूण पदे :- ५२**

| सामाजिक आरक्षण / कप्पीकृत आरक्षण | अनुसूचित जाति | | अनुसूचित जमाती | | विमुक्त जाती अ | | भटक्या जमाती ब | | भटक्या जमाती क | | भटक्या जमाती ड | | विशेष मागास प्रवर्ग | | इतर मागास वर्ग | | खुला | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** | **पु** | **म** |
| सर्वसाधारण | २ | १ | २ | १ | २ | ० | ० | ० | २ | १ | १ | ० | २ | ० | ४ | १ | १० | ५ | २५ | ९ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ |
| भूकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ० |
| माजी सैनिक | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ४ | ० | ६ | ० |
| गृहरक्षक दल | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ |
| अंशकालीन पदवीधर | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ | १ | ४ | १ |
| एकूण जागा | **४** | **१** | **२** | **१** | **२** | **०** | **०** | **०** | **२** | **१** | **१** | **०** | **२** | **०** | **६** | **१** | **२०** | **९** | **३९** | **१३** |

समांतर आरक्षण नमूद तक्त्यानुसार लागू राहील. तक्त्यामध्ये दर्शविलेली पदे व त्यानुसार आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. या पदावरील नियुक्ती ही खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येईल.

(i) **वयोमर्यादा :-** दिनांक ०१/१२/२०१५ रोजी ज्यांचे वय १९ वर्षापेक्षा कमी व २६ वर्षापेक्षा जास्त नाही. मागसावर्गीयांचे बाबतीत शासनाने निर्देशित केलेप्रमाणे उच्चतम वयोमर्यादेत ०५ वर्षे सवलत अनुज्ञेय राहील. अगोदरपासून शासन सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांना कमाल वयोमर्यादेत ०५ वर्षे सूट देय राहील.

(ii) **शैक्षणिक अर्हता:-**

(१) (अ) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण **आणि**

(ब) महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्याकडून चालविण्यात येणारा दोन वर्षाचा वीजंतत्री ट्रेडमधील व्यवसाय अभ्यासक्रम पूर्ण आणि उत्तीर्ण केला असावा; **किंवा**

(ब) राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या अंगीकृत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (हस्त व्यवसाय) यांच्याकडून चालवण्यात येणारा दोन वर्षाचा अभ्यासक्रम (आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन ट्रेड) पूर्ण आणि उत्तीर्ण केला असावा

**किंवा**

(२) उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण केली आहे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने विहित केलेले वायरमन लायसन्स ग्रेड II धारण केले आहे.

**(iii) अनुभव :-**

उपरोक्त शैक्षणिक पात्रतेमधील अ.क्र.१ मधील अर्हता धारण करणा-या उमेदवारांनी नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेशी संबंधित एक वर्षाचे अप्रेन्टीसशीप सर्टीफिकेट धारण केले असावे किंवा कोणताही उद्योग वा संस्था व संशोधन आणि विकास संस्था यामध्ये किमान एक वर्षाचा कामाचा प्रत्यक्ष अनुभव आवश्यक. **किंवा**

उपरोक्त शैक्षणिक पात्रतेमधील अ.क्र.२ मधील अर्हता धारण करणा-या उमेदवारांना विद्युत क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा दोन वर्षाचा अनुभव आवश्यक.

**(iv) शारिरीक पात्रता :-**

| | **पुरुषांकरिता** | **महिलांकरिता** |
|---|---|---|
| अ) उंची | १६३ सें.मी. पेक्षा कमी नसावी | १५३ से.मी. पेक्षा कमी नसावी |
| ब) छाती | न फुगवता ७९ सें.मी. आणि फुगवून ८४ से.मी. पेक्षा कमी नसावी (न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा). | ----- |

**ड) <u>पदाचे नाव</u> :-पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस):-**

**(पे बँड :-रुपये ५२००-२०२०० ग्रेड पे -१८००), एकूण पदे :- ५३**

| सामाजिक आरक्षण / कप्पीकृत आरक्षण | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | विमुक्त जाती अ | | भटक्या जमाती ब | | भटक्या जमाती क | | भटक्या जमाती ड | | विशेष मागास प्रवर्ग | | इतर मागास वर्ग | | खुला | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म | पु | म |
| सर्वसाधारण | २ | १ | १ | ० | १ | १ | १ | १ | २ | १ | २ | १ | १ | १ | ३ | २ | १० | ५ | २३ | १३ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | २ | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | २ | ० |
| भूकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ३ | ० | ७ | ० |
| गृहरक्षक दल | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | २ | ० |
| अंशकालीन पदवीधर | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | १ | ३ | १ |
| एकूण जागा | **४** | **१** | **१** | **०** | **१** | **१** | **१** | **१** | **३** | **१** | **२** | **१** | **१** | **१** | **९** | **२** | **१७** | **६** | **३९** | **१४** |

समांतर आरक्षण नमूद तक्त्यानुसार लागू राहील. तक्त्यामध्ये दर्शविलेली पदे व त्यानुसार आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. या पदावरील नियुक्ती ही खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येईल.

**(i) वयोमर्यादा :-** दिनांक ०१/१२/२०१५ रोजी ज्यांचे वय १८ वर्षापेक्षा कमी व २५ वर्षापेक्षा जास्त नाही. मागसावर्गीयांचे बाबतीत शासनाने निर्देशित केलेप्रमाणे उच्चतम वयोमर्यादेत ०५ वर्षे सवलत अनुज्ञेय राहील.

अगोदरपासून शासन सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांना कमाल वयोमर्यादेत ०५ वर्षे सूट देय राहील.

**(ii) शैक्षणिक अर्हता :-**

अ) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे. आणि

ब) महाराष्ट्र राज्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचेकडील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील खालील पैकी कोणताही व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

१) रंगारी (Painter)
२) सुतारकाम (Carpenter)
३) पत्रे कारागीर / शिट मेटल (Sheet Metal)
४) जोडारी (Fitter)
५) मेकॅनिक रेडिओ आणि टेलीव्हीजन (Mechanic Radio and Television)
६) इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक (Electronics Mechanic)
७) कॉम्प्युटर हार्डवेअर (Computer Hardware)

(iii) **अनुभव :-** वरील अ.क्र. २, ३ आणि ७ मध्ये नमूद ट्रेड पूर्ण केलेल्या उमेदवारांनी, संबंधित ट्रेड मधील अप्रेन्टीसशीप प्रशिक्षण प्रमाणपत्र धारण करणे किंवा शासन मान्य अथवा नोंदणीकृत संस्थेतील अथवा उद्योगातील किंवा संशोधन व विकास संस्थेतील किमान एक वर्षाचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव धारण करणे आवश्यक आहे.

**टीप १:** अनु.क्र.१, ४,५ व ६ मध्ये नमूद ट्रेड पूर्ण केलेल्या उमेदवारांना अनुभवाची अट लागू नाही.

**टिप २ :** वैध वाहन चालक परवाना धारक उमेदवारास आवश्यकतेनुसार वाहन चालकाचे कर्तव्य बजावावे लागेल.

(iv) **शारिरीक पात्रता :-**

| | पुरुषांकरिता | महिलांकरिता |
|---|---|---|
| अ) उंची | १६३ सें.मी. पेक्षा कमी नसावी | १५३ से.मी. पेक्षा कमी नसावी |
| ब) छाती | न फुगवता ७९ सें.मी. आणि फुगवून ८४ से.मी. पेक्षा कमी नसावी (न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा). | ----- |

५) **शारीरिक पात्रतेत सर्व पदांकरिता द्यावयाची सूट :-**

अ) **अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती :-** शासकीय सेवेत कार्यरत असताना दिवंगत झालेल्या, वर्ग ''क'' व ''ड'' मधील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील पात्र व्यक्तीस अनुकंपा तत्वानुसार संबंधीत घटक प्रमुखाकडे असलेल्या यादीवरील सेवाज्येष्ठताक्रमानुसार व सामान्य प्रशासन विभाग यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार नियुक्ती देण्यात येईल. पोलीस विभागातील अनुकंपा तत्त्वावरील अर्हताप्राप्त उमेदवारांनी त्यांचे अर्ज ऑनलाईन ऐवजी आपापल्या घटकप्रमुखांमार्फत दि.१८/०१/२०१६ रोजी पर्यंत किंवा त्यापूर्वी या कार्यालयास पोहोचतील असे सादर करावेत.

अनुकंपा नियुक्ती योजनेसाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशान्वये विहित केलेली कार्यपध्दती सदर सर्व पदांसाठी पालन करणे आवश्यक राहील. अनुकंपा नियुक्तीकरिता पात्र उमेदवारांसाठी पुढे नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल :-

(i) उंची :- २.५ सेंटीमीटर,

(ii) छाती :- पुरुष उमेदवारासाठी न फुगवता २ सेंटीमिटर व १.५ सेंटीमिटर फुगवून

ब) **नक्षलग्रस्त भागातील उमेदवारांसाठी :-**

शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेल्या खालील उमेदवारांसाठी

(i) अनुसूचित जमातीचे उमेदवार

(ii) नक्षलींच्या हल्ल्यात किंवा नक्षल विरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेले पोलीस खबरी अथवा पोलीस पाटील किंवा पोलीस कर्मचारी यांची मुले यांना पुढे नमूद केल्याप्रमाणे शारीरिक पात्रता शिथिल करण्यात येईल.

(i) उंची :- २.५ सेंटीमिटर्स,

(ii) छाती :- मोजमापाची आवश्यकता नाही.

६) वरील नियमात काही अंतर्भूत असले तरी अनुभवाच्या बाबतीत निवडीच्या कोणत्याही टप्प्याला अनुसूचित जाती, बौध्द धर्मांतरीत, अनुसूचित जमाती व विमुक्त किंवा भटक्या जमातीं करीता राखून ठेवलेली रिक्त पदे भरण्याकरीता विहित अनुभव धारण करणारे पुरेसे उमेदवार उपलब्ध नाहीत असे जर निवड प्राधिकरणाचे मत झाले तर, निवड प्राधिकरणाला अशा निवडीच्या बाबतीत अनुभव कालावधी ०१ वर्षापर्यंत शिथिल करुन या जाती / जमातीच्या योग्य उमेदवाराची निवड करता येईल.

७) उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे आवश्यक आहे. रहिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.

८) उमेदवारांनी त्यांची सर्व प्रमाणपत्र अर्ज भरावयाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत (दिनांक ०६/०१/२०१६) संबंधित विभागांकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. उमेदवाराने प्रमाणपत्र प्राप्त करावयाच्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरण्यात येणार नाही.

९) आर्थिक निकषांबाबतचे तत्व (क्रिमेलिअर) लागू करण्यात आलेल्या प्रवर्गातील (इ.मा.व., वि.जा.-अ, भ.ज.-ब,क,ड व वि.मा.प्र.) उमेदवारांना उन्नत व प्रगत वर्गात मोडत नसल्याचे चालू वर्षाचे दिनांक ०१/०४/२०१५ ते दिनांक ३१/०३/२०१६ अथवा पुढील वित्तीय वर्षाचे सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले दिनांक ०५/०१/२०१६ पर्यंत किंवा त्या पूर्वीचे नॉन क्रिमेलिअर प्रमाणपत्र आवश्यक राहील.

१०) महिला आरक्षणाबाबत महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय दिनांक २५/०५/२००१ मधील तरतुदीनुसार खुल्या प्रवर्गातील महिलांना ३० टक्के आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उन्नत व प्रगत वर्गात मोडत नसल्याचे चालू वर्षाचे दिनांक ०१/०४/२०१५ ते ३१/०३/२०१६ अथवा पुढील वित्तीय वर्षाचे सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेल्या ०५/०१/२०१६ पर्यंत किंवा त्या पूर्वीचे नॉन क्रिमेलिअर प्रमाणपत्र आवश्यक राहील.

११) प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त / खेळाडू / गृहरक्षकदल / अंशकालीन पदवीधर / माजी सैनिक हे उमेदवार एकाचवेळी दोन समांतर आरक्षणाचा लाभ घेण्याबाबतची नोंद ऑनलाईन अर्जात करतात. तरी, अशा उमेदवारांना एकाच समांतर आरक्षणाचा लाभ देय असल्याने प्राथम्यक्रम उमेदवाराने निश्चित करावेत.

१२) अर्ज महाऑनलाईन च्या अधिकृत केंद्रांवरसुध्दा भरता येईल. आवश्यक माहिती उपरोक्त नमूद संकेत स्थळांवर उपलब्ध आहे.

१३) **परीक्षा शुल्क * :**

| जाहिरात क्रमांक | पदाचे नांव | खुला प्रवर्ग | मागास प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | सहायक पोलीस उप-निरीक्षक (रेडीओ यांत्रिकी) | ५५० | ४५० |
| २ | पोलीस हवालदार (यंत्रचालक) | ५५० | ४५० |
| ३ | पोलीस हवालदार (विजतंत्री) | ५५० | ४५० |
| ४ | पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) | ५५० | ४५० |

* सदरचे शुल्क ना-परतावा आहे.

**टिप** :- माजी सैनिक यांचेकरिता कोणतेही परिक्षाशुल्क लागू नाही.

१४) **अर्जदारांकरीता सर्वसाधारण सूचना -**

**१) निवड प्रक्रिया :-**

अ) (i) अर्हताप्राप्त उमेदवार ऑनलाईन परिक्षेकरिता पात्र राहतील. सदर परिक्षेचे माध्यम इंग्रजी राहील. यामध्ये गणित, संगणक ज्ञान, सामान्य ज्ञान, चालू घडामोडी, सामान्य शास्त्र व पदाचे संबंधित विषयातील तांत्रिक ज्ञानाचा समावेश असेल.

(ii) परीक्षेचा कालावधी १०० मिनीटांचा असेल.

(iii) उपरोक्त नमूद संकेतस्थळावर उमेदवारांकरिता ऑनलाईन परिक्षेचे स्वरुप समजणेकरिता सराव चाचणी (Mock Test) चा पर्याय उपलब्ध करुन देण्यात येईल.

ब) शारिरीक निकष पूर्ण करणाऱ्या व गुणवत्ता प्राप्त उमेदवारांना आरक्षण व रिक्त पदांनुसार शारिरीक मोजमापे व प्रमाणपत्र पडताळणी साठी बोलावण्यात येईल. याबाबतची माहिती वेळोवेळी उपरोक्त संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यात येईल.

क) मुलाखत :- शासन निर्णय गृह विभाग क्रमांक पीडीब्ल्युएस-०५१४/प्र.क्र.५४०/पोल-४, दिनांक २८/०४/२०१५ अन्वये मुलाखत प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.

**२)** (अ) नमूद पदांवर नियुक्त व्यक्ती नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीकरीता परिविक्षाधीन राहील. नियुक्त व्यक्तीने परिविक्षा कालावधी यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

(ब) सहायक पोलीस उप निरीक्षक (रेडियो यांत्रिकी) आणि पोलीस हवालदार (बिनतारी यंत्रचालक) या पदावर नियुक्त झालेल्या उमेदवारास विभाग प्रमुखांनी निश्चित केलेले तांत्रिक मूलभूत प्रशिक्षण अभ्यासक्रम पोलीस बिनतारी संदेश प्रशिक्षण केंद्र, पुणे येथे किंवा / आणि अपर पोलीस महासंचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निश्चित / नियोजित केलेल्या ठिकाणी यशस्वीरित्या पूर्ण करणे आणि विहित परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

(क) त्याने / तिने प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण न केल्यास,प्रशिक्षणाशिवाय संबंधित विहित परीक्षा त्यापुढील सहा महिन्यांमध्ये जास्तीतजास्त दोन संधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.सदर कालावधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत त्यांना वार्षिक वेतनवाढ देय होणार नाही. सदर परिक्षा सहा महिन्यांच्या कालावधीत उत्तीर्ण होऊ न शकल्यास, कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय तो/ ती सेवा समाप्तीस पात्र राहील.

(ड) उपरोक्त पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीचे परिविक्षा कालावधीतील प्रशासकीय काम व शिस्त याबाबत प्रत्येक तीन महिन्यानंतर पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उपायुक्त, बिनतारी यांचे कडून स्थानिक बिनतारी घटक प्रमुख यांचे मार्फत मूल्यमापन करण्यात येईल. सदर मूल्यमापनात त्याला / तिला पात्र ठरणे आवश्यक राहील.

**३)** सहायक पोलीस उप निरीक्षक (रेडियो यांत्रिकी) आणि पोलीस हवालदार (बिनतारी यंत्रचालक) या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीस प्रशिक्षण कालावधीनंतर पोलीस बिनतारी संदेश विभागात किमान पाच वर्षे

सेवा करण्याचे अनुक्रमे १,००,०००/- (अक्षरी रु. एक लाख फक्त) चे व रु. ७५,०००/- (अक्षरी रु. पंच्याहत्तर हजार फक्त) चे प्रतिज्ञापूर्वक बंधपत्र देणे आवश्यक राहील.

४) **चारित्र्य व पूर्व आयुष्य पडताळणी :-** उपरोक्त पदांवर निवड झालेल्या उमेदवारांचे चारित्र्य आणि पूर्व आयुष्य पडताळणी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय उमेदवारास नियुक्ती देण्यात येणार नाही किंवा प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणार नाही. ज्या उमेदवारांविरुध्द गुन्हा दाखल आहे किंवा खटला प्रलंबित आहे अशा उमेदवारांना नियुक्ती देण्यात येणार नाही. याबाबतीत भरती प्राधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

५) **वैद्यकीय तपासणी :-** निवड झालेल्या उमेदवारांची महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार आणि शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशास अनुसरुन वैदयकीय चाचणी करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीत तिरळेपणा, रंगआंधळेपणा, गुडघ्यास गुडघा लागणे, सपाट तळवे, त्वचा आणि छातीचे रोग आणि पोलीस महासंचालक यांनी वेळोवेळी विहित केलेल्या इतर वैद्यकीय चाचण्यांचा समावेश असेल. निवड झालेले जे उमेदवार सदर चाचण्यांमध्ये अपात्र ठरतील त्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात येणार नाही.

६) **आरक्षण** :- उक्त पदांकरीता मागासवर्गीय, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, महिला, खेळाडू, अंशकालीन पदवीधर आणि गृहरक्षकदल यांच्यासाठी शासनाने, वेळोवेळी विहित केलेले आरक्षण लागू राहील. मागास प्रवर्गातील उमेदवारांना व सदर घटकांतील उमेदवारांना सर्व पात्रता निकष पूर्ण करणे आवश्यक राहील. गृहरक्षकदलामध्ये काम करणाऱ्या उमेदवारांनी जाहिरातीच्या दिनांकास किमान ०३ वर्ष (१०९५ दिवस) एकत्रित सेवा केलेली असणे आवश्यक आहे. सदर पदासाठी आवश्यक शैक्षणिक व शारिरीक पात्रता पूर्ण करणाऱ्या विहित वयोमर्यादेतील गृहरक्षकांची अनुज्ञेय आरक्षणाप्रमाणे पदे भरण्यात येतील.

७) सदर पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

८) सदर पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीस त्यासंबंधाच्या नियमानुसार विहित केलेली हिंदी आणि मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली नसेल अथवा ती उत्तीर्ण होणेपासून सूट मिळालेली नसल्यास सदर परिक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

९) सदर पदांवर निवड झालेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही नियुक्ती / बदलीस पात्र राहील.

१०) निवड झालेल्या उमेदवारास संबंधित पदाचे नियमानुसार वेतन व भत्ते अनुज्ञेय असतील.

११) सदर पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीस महाराष्ट्र पोलीस नियमावली१९५१ महाराष्ट्र पोलीस (शिस्त व अपील) नियम१९५६ महाराष्ट्र पोलीस नियमावली आणि राज्य शासनाने व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम किंवा आदेश लागू राहतील.

१२) भरती प्रक्रिया सुरु असताना कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर उमेदवाराने अर्जात वा अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे / प्रमाणपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

१३) जाहिरातीतील सूचना / मजकूर पूर्णपणे वाचूनच अर्ज करण्याची दक्षता उमेदवारांनी स्वत: घ्यावी. आवेदन अर्जातील चुकांना उमेदवार स्वत: जबाबदार राहतील.

१४) उमेदवाराने ऑन लाईन अर्ज करत असताना दिलेले भ्रमणध्वनी (Mobile Number) क्रमांक व ई-मेल आय.डी. (E-Mail ID) बदलू नयेत. तसेच उमेदवारांना भरती संबंधी सूचना वेळोवेळी नमूद संकेत स्थळांवर उपलब्ध करून दिल्या जातील. त्याप्रमाणे सूचनांचे उमेदवाराने पालन करणे बंधनकारक राहील.

१५) भरती प्रक्रियेमधील कोणत्याही चाचणीसाठी येण्या-जाण्याकरिता उमेदवारास प्रवासखर्च दिला जाणार नाही.

१६) सदर भरती प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१७) भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधीत उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१८) भरती प्रक्रियेदरम्यान जर एखाद्या उमेदवाराने सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अशा उमेदवारांचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्यात येईल. अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी असल्याचे आढळून आल्यास संबंधीत उमेदवार दंडात्मक

कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील व भा.द.वि.कलम १९९ व २००(२) प्रमाणे कारवाईस पात्र राहील.

**१९)** पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

**२०)** माजी सैनिकांसाठी सशस्त्र दलात ०६ महिने सेवा केलेल्या माजी सैनिकांमधील, त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड कालावधी अधिक ०३ वर्ष एवढा कालावधी त्यांचा विहित दिनांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल.

**२१)** (१) स्वातंत्र सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, (२) सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, (३) सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी, (४) भूकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त उमेदवार यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

**२२)** अंशकालीन कर्मचारी उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.

**२३)** भरती प्रक्रियेअंतर्गत पदांची संख्या, प्रवर्गनिहाय पदसंख्या, सदर भरती प्रक्रियेमध्ये अंशत: बदल करणे, स्थगित करणे, परिक्षा कोणत्याही टप्प्यावर रद्द करणे, याबाबतचे सर्व अधिकार भरती प्राधिकारी यांना राहतील.

**२४)** सदर भरतीच्या नियम निकषांमध्ये भरती पूर्ण होईपर्यंत शासन अधिसूचना / निर्णय / परिपत्रक / पत्रानुसार बदल झाल्यास त्या त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. ती सर्वांवर बंधनकारक राहील.

**२५)** (i) जन्मदिनांकासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेला जन्म नोंद दाखला / शालांत परिक्षा प्रमाणपत्र, प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी सादर करावे.

(ii) आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जात प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

(iii) जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ ब, दिनांक १२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्रमांक २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५/०८/२०११ रोजी दिलेल्या आदेशा विरोधात मा.सर्वोच्च न्यायलय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून तात्पुरता नियुक्ती आदेश निर्गमित केलेल्या दिनांकापासून ०६ महिन्याच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

(iv) प्रत्येक संवर्ग पदास विहित केलेल्या शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवाराच्या बाबतीत अनुभवाच्या कालावधीची गणना करताना तासिका, नियतकालीक, अंशकालीक, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणुकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी ग्राह्य धरला जाणार नाही. अंशकालीन उमेदवाराचे बाबतीत त्यांनी सुशिक्षीत बेरोजगार अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये ०३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले असले पाहिजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहिजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी बाबतची कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करावी लागतील.

**२६)** सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दिनांक २८/०३/२००५ व शासन परिपत्रक क्रमांक, एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक ०१/०७/२००५ तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान मुलांचे प्रतिज्ञापन) नियम-२००५ अन्वये दिनांक २८/०३/२००५ रोजी हयात असलेल्या व त्या नंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या या बाबत लहान कुटुंब असलेचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहित असणाऱ्या उमेदवारांनीही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

**२७)** जाहिरातीतील पदांच्या भरती बाबत अध्यक्ष, भरती समिती यांचा निर्णय अंतिम असेल, त्या बाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिक पातळीवर कोणाशीही करु नयेत याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२८) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२९) मागासवर्गीय उमेदवारांनी, ऑनलाईन अर्ज सादर करण्यापूर्वी कोणत्या प्रवर्गातून अर्ज भरावयाचा आहे हे निश्चित करुनच ऑनलाईन अर्जात तशी माहिती नोंद करावी. याबाबत, उमेदवारांकडून नंतर कोणतेही अभिवेदन अथवा तक्रार घेतली जाणार नाही.

३०) जे उमेदवार मूळ शैक्षणिक प्रमाणपत्र पुढील शिक्षण घेत असल्याने पडताळणीचे वेळेस सादर करु शकणार नाहीत अशा उमेदवारांनी सध्या ते ज्या शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत आहेत त्या शैक्षणिक संस्थेतील प्राचार्यांकडून साक्षांकित केलेल्या मूळ प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती सादर कराव्यात. तसेच जे मूळ प्रमाणपत्र जमा केले आहे त्याबाबतचे तपशिलवार पत्र आणावे.

३१) आवेदन अर्ज एकदा Submit केलेनंतर त्यात पुन्हा बदल करता येणार नाही.

३२) भरती करणेबाबत कोणीही पैशाची अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधित उमेदवाराने त्याबाबतची माहिती पोलीस अधीक्षक / पोलीस उप-आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांचे कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२१३४ व ०२०-२६१२८८९१ तसेच टोल-फ्री क्रमांक १८०० २२२ ०२१ या दूरध्वनी क्रमांकावर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी.

३३) उमेदवारांना काही अडचणी भासल्यास महाऑनलाईन दुरध्वनी क्रमांक ०२२-६१३१६४०० या हेल्प लाईन नंबरवर ०९:३० ते १९:३० या वेळेत संपर्क साधावा.

**महत्वाची टीप :-**

- उमेदवाराला ऑनलाईन परिक्षा उत्तीर्ण व इतर सर्व पात्रता निकष पूर्ण करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती उपरोक्त नमूद संकेतस्थळांवर (Home page) उपलब्ध आहे.
- प्रस्तुत पदांकरिता फक्त अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरण्यात आलेले ऑनलाईन अर्जच स्वीकारले जातील.
- अधिक माहितीसाठी उमेदवाराने (सेवाप्रवेश) नियम २०१२ दिनांक ०६/०३/२०१२ व (सुधारणा) नियम २०१४ दिनांक ०४/०३/२०१४ चे कृपया अवलोकन करावे. सदर सेवाप्रवेश नियमांतील अटी व शर्ती सर्व उमेदवारांना लागू राहतील. सदरचे सेवाप्रवेश नियम उपरोक्त नमूद संकेतस्थळावर (Home page) उपलब्ध आहेत.
- भरती प्रक्रियेमध्ये सहभागी होणाऱ्या उमेदवारास कोणतीही इजा / नुकसान झाल्यास त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.
- भरती प्रक्रियेअंतर्गत पदांची संख्या, प्रवर्गनिहाय पदसंख्या, सदर भरती प्रक्रियेमध्ये अंशत: बदल करणे, स्थगित करणे, कोणत्याही टप्प्यावर रद्द करणे, याबाबतचे सर्व अधिकार भरती प्राधिकारी यांना राहतील.
- भरतीबाबत काही विवाद निर्माण झाल्यास, त्याबाबतचा अंतिम निर्णय हा भरती प्राधिकारी यांचा राहील.

**(ई.दा.कांबळे)**
अध्यक्ष, भरती प्रक्रिया समिती **तथा**
पोलीस अधीक्षक, बि.सं. मुख्यालय
अपर पोलीस महासंचालक व संचालक
पोलीस बिनतारी संदेश, म.राज्य, पुणे कार्यालय